# घटक ३ : कथा

## (अ) कातरवेळ — अरविंद गोखले

अनुक्रमणिका


**३.० उद्दिष्टे**

**३.१ प्रास्ताविक**

**३.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टीपा**

**३.३ कथेचे अध्ययन**

- ३.३.१ अक्काचे माहेरी आगमन
- ३.३.२ अक्कावर झालेला मायेचा कौतुकाचा वर्षाव
- ३.३.३ कथेची अखेर

**३.४ नमुना उत्तरे**

**३.५ अधिक अध्ययन**

- ३.५.१ कथेचे भाषिक विशेष
- ३.५.२ जुनी आणि नवी कथा
- ३.५.३ कथालेखन विशेष
- ३.५.४ लेखक परिचय
- ३.५.५ कथेच्या काही व्याख्या

**३.६ सारांश**

**३.७ सरावासाठी स्वाध्याय**

**३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## ३.० उद्दिष्टे

घटक ३ मध्ये कथा (Short-story) या साहित्यप्रकाराचा अभ्यास करावयाचा आहे. 'कातरवेळ' आणि 'बळीव' या दोन कथांचा अभ्यासासाठी समावेश केलेला आहे. प्रथम 'कातरवेळ' या अरविंद गोखले यांच्या कथेचे अध्ययन करू या.

या कथेचे अध्ययन केल्यावर तुम्हाला

१. 'कथा' या साहित्यप्रकाराचा परिचय होईल.
२. लघुकथा आणि नवकथा यांची वैशिष्टचे स्पष्ट करता येतील.
३. या दोहोंतील वेगळेपण विशद करता येईल.
४. या कथेचा आस्वाद घेता येईल.
५. या कथेतून प्रकट होणाऱ्या कौटुंबिक संबंधाचे स्वरूप स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

कथाप्रियता हा मानवी मनाचा सनातन धर्म आहे. कथा ऐकणे आणि कथा सांगणे माणसाला आवडते. मराठीत 'कथा' हा वाङ्मयप्रकार अतिशय संपन्न आहे. गोष्ट, संपूर्ण गोष्ट, लघुकथा, नवकथा अशा विविध अवस्थांतून मराठी कथेची वाटचाल झाली आहे.

कथा हा निवेदनात्मक ललित साहित्याचा प्रकार होय. कथेतून कार्यकारणभाव असलेल्या घटनामालिकेचे कथन किंवा निवेदन केलेले असते. कथेत घडून गेलेल्या घटनांची जी गुंफण केलेली असते ती कालानुक्रम, कार्यकारणभाव इत्यादी तत्त्वांनुसार असते. लेखक काय कथन करतो आणि कसे कथन करतो याला महत्त्व आहेच. कथेतील आशय कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, निवेदनरीती, भाषा, संवाद इत्यादी घटक-उपघटक विचारात घ्यावे लागतात. या सर्वांतून कथेला एकजिनसी, सेंद्रिय स्वरूपाचा आकृतिबंध लाभतो. कथेचा संस्कार एकात्म असतो.

कथा कधी व्यक्तिजीवनातील किंवा समाजजीवनातील विशिष्ट अवस्थेचे चित्रण करते तर कधी व्यक्तीच्या विशिष्ट भावस्थितीचा प्रत्यय आणून देते, तर कधी एखादी घटना वा अनुभव अर्थपूर्ण करीत असते. कथेचे लघुत्व आणि तिच्या संस्काराचे एकात्म रूप यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत काही विशेष अपरिहार्यपणे येतात. एककेंद्रित्व, मितव्यय, संक्षिप्तता, संपृक्तता, अर्थगर्भता, नेमकेपणा इत्यादी काही विशेष सांगता येतील. कथेतून घडते ते जीवनदर्शन आणि मनुष्यदर्शन. कथेतून घडणाऱ्या जीवनांगाचे दर्शन हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग असते.

## ३.२ शब्दार्थ, वाक्प्रचार आणि टीपा

**लेट** – उशीर
**शतपावली** – अन्नपचनासाठी थोडे चालणे, फेऱ्या मारणे
**गृहलक्ष्मी** – पत्नीला उद्देशून 'घराची लक्ष्मी' या अर्थाचा शब्दप्रयोग केला जातो
**ऊर्मी** – लहर, लाट
**हेवा** – मत्सर
**गोंगाट** – गडबड
**सढळ** – अघळपघळ, उदार
**माथा** – डोके
**औक्षवंत** – पुष्कळ आयुष्य लाभलेले असावे असा आशीर्वाद वाचक शब्द
**क्लास** – वर्ग
**शुकशुकाट** – स्तब्धता, निःशब्द शांतता
**फुलपात्र** – पिण्याचे भांडे
**अगत्याने** – आपुलकीने
**पिंगा घालणे** – जागचे जागी फिरण्याचा, मुलींचा खेळ
**उजळणी होणे** – आढावा घेणे.
**तोंड भरून स्तुती करणे** – अमर्याद स्तुती करणे

## ३.३ कथेचे अध्ययन

**'कातरवेळ' या कथेचे अध्ययन तीन भागात करावयाचे आहे. या कथेचा प्रथम भाग नीट वाचा आणि त्यावर मनन करा.**

रात्रीच्या जेवणाची वेळ टळून गेली तरी घरातली मुलं अक्काच्या मोटारची वाट पहात तशीच अवघडून बसली होती. अक्का सासरहून यायची म्हणजे त्यांना काहीतरी अद्‌भूत अन् अपूर्व गोष्ट वाटत होती. मोठ्या मुलामुलींचा अभ्यास कधीच आटोपला होता व अक्काजवळ कोण जेवणार, कोण झोपणार. याबद्दल त्याच्या चढाओढी चालू होत्या. सावित्रीबाईंना मोटार कधी कधी 'लेट' होते हे माहीत होतं, पण त्यांनी दाराच्या कडीला दुपारीच पळी अडकवून ठेवली होती. ओवाळावयाची भाकरी केव्हाच उंबऱ्यापर्यंत पोचली होती. सहज म्हणून अंगणात शतपावली करणारे अण्णा बस-सर्व्हिसला हळूच शिव्या मोजीत, डोक्याला टोपी चढवून स्टँडच्या रस्त्याला सटकले होते. गावच्या वेशीतून मोटार आत शिरली तेव्हा घराचं हेच चित्र अक्काच्या नेत्रांपुढे नाचत होतं. घरी आपल्या आगमनाबद्दलची आतुरता पराकोटीला पोहोचली असेल, गडद्या-मोलकरीणपासून सारी आपली वाट पाहत असतील, सासरहून आलेल्या हया गृहलक्ष्मीचं दर्शन होताच माहेरच अणुरेणू मंगलमय होतील जणू.... अक्काला वाटलं, आणिक जरा उशीर झाला तरी चालेल, म्हणजे....

पण दुसऱ्याच क्षणी तिनं अस्वस्थ चाळवाचाळव केली. मधल्या आळीतून न जाता गाडी तळ्याला वळसा घालून जरा दूरच्या मार्गानं जाऊ लागलेली पाहून तिच्या कपाळावर आठ्या उमटल्या. साऱ्या वाटभर तिच्या दागिन्यांचं कौतुक करणाऱ्या लठ्ठ बाईची आता तिला दाटी वाटू लागली.

'हयापेक्षा रेल्वे-बसनेच लवकर पोचशील' असं नवरा म्हणाला होता ते तिला आठवलं. अन् नवऱ्याची आठवण येताच केव्हा एकदा घरी पोचतो असं तिला पुन्हा पुन्हा वाटू लागलं

आतुरता, आवेग, आनंदोर्मी... आपल्या घराचं दर्शन होताच अक्काच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले. सारं घर हसण्यानं फुलून निघालं. धावत पळत येत अण्णांनी ड्रायव्हरशी कसलासा विनोद केला. मुलांनी अक्काचं सामान गडी धावायच्या आत बाहेर काढलं. छोट्या बालगोपाळांनी अक्काच्या अंगाशी लोंबकळायला सुरुवात केली. सावित्रीबाईंना आधी नेत्रांनी ओवाळावं की भाकरीनं हेच सुचेनासं झालं.

अक्काला अगदी झपूर्झा घातल्यागत वाटलं. अचानक तिच्या डोळ्यांपुढे ती सासरहून निघाली तेव्हाचा प्रसंग उभा राहिला. सासरा, सासू, आजे-सासू सुनेला 'जपून जा' म्हणून पुनः पुनः निरोप देत होती. दीर, नणंदा, गडीमाणसही वहिनीच्या भोवती भोवती करीत होती.

ते ओढ लावणारे निरोप अन् हे वेड लावणारं स्वागत! अक्काला स्वतःचाच हेवा वाटू लागला. इतकी मायेची माणसं, इतकं सुंदर सासर, अन् त्याहून असा सोन्यासारखा पती मिळणं हे केवढं भाग्य!

मनाच्या मोहोळातून आनंद ओसंडत होता! त्याभोवती सारी पिंगा घालीत होती. पानावर जेवायला बसल्यापासून भावांनी नि बहिणींनी थट्टा करायला सुरुवात केली— पंतांना का नाही आणलंस? त्यांनी किती दिवस राहायची परवानगी दिली आहे? जेवण झाल्यावर लगेच नवऱ्याला पत्र लिहायला बसणार असशील? — एक ना दोन! लहान मुलं तर जेवण थांबवून तिच्याभोवती गोंगाट करू लागली— अक्का, तुमच्या घरी रेडिओ आहे का ग? अन् तुला म्हणे नवऱ्यानं सायकलवर बसायला शिकवलं आहे-- सावित्रीबाई लेकीला सढळपणे वाढीत होत्या; अन् हयाविना दुसरं कसं कौतुक करायचं हे त्यांना उमजत नव्हतं. सोप्यावर अण्णा 'केसरी' वाचीत आतला कौतुक-सोहळा नेत्रानी निरखीत होते.

आनंदातिशयाने अक्काला धडपणे जेवण जाईना. पुढ्यात हटून बसलेल्या भाच्याला भरवायचं. धाकट्या बहिणीने गाल फुगवून सांगितलेल्या शाळेतल्या गंमती ऐकायच्या, दादाच्या थट्टेला प्रत्युत्तर करायचं, अन् आईकडे हसरे दृष्टिक्षेप टाकायचे. हया साऱ्या गोड काल्यात घास पोटात जाणार कसे? दर घासागणिक, श्वासागणिक एकच! संसार, स्वर्गसुख!

जेवण आटोपल्यावर बाळगोपाळांना घेऊन ती अंथरुणावर आडवी झाली. खाऊच्या दुकानदाराबद्दल किंवा गोष्टी सांगणाऱ्या आजीबद्दल वाटणारा आदर त्यांना अक्काबद्दल वाटत होता. भक्तिभावाने नि धिटाईनं ती अक्काला बोलायला लावीत होती. अक्काही वडील माणसं आसपास नसल्याने मोकळेपणाने उत्तर देत होती. उत्तरंही अशी की त्यातून हवे ते प्रश्न निघावेत. पतीबद्दल प्रश्न. अन् त्याभोवती विणलेल्या आपल्या प्रीतीचे!

पोरं पेंगुळली, परंतु अक्काच्या प्रेमाच्या अद्‌भुत कथा चालूच होत्या. अजाण मुलांपुढे मोकळेपणानं नि सरळपणानं बोलण्यात केवढा निराळाच आनंद असतो! — संसारातल्या क्षुल्लक गोष्टीदेखील अक्का

उगाच गडबडली. मुलं झोपलेली लक्षात येताच ती उठली. स्वैपाकघरात आईचं जेवण आटोपत होतं तेथे आली. दोघींची दृष्टादृष्ट होताच दोघीही हसल्या. जिवाभावाच्या मैत्रिणी हसतात तशा! – आपली आई, आई तर आहेच– पण आता आपल्या संसारातल्या अडचणी, सुखदु:खं आपलेपणानं ऐकणारी सखीपण आहे, हे ध्यानात येताच अक्का अधिकच बहरली!

सावित्रीबाईचं सारं काम आटोपलंच होतं. झाकपाक करून व स्वैपाकघर बंद करून मायलेकी झोपायच्या खोलीत आल्या. अंथरुणावर आडव्या झाल्या. सर्वत्र शांतता होती. खोलीत समईचा जेमतेम उजेड उरला होता. पण अक्काला आईजवळ असल्यानं सुखाचा झगझगीत ठेवा मिळाल्यासारखं झालं होतं. एकांतात मोकळेपणाने आपल्या आईशी काय काय बोलायचं हे तिने केव्हापासून ठरवून ठेवलं होतं. सावित्रीबाई तिच्या सासूबद्दल, जावांबद्दल अन् नवऱ्याबद्दल विचारू लागल्या, तेव्हा नव्या नव्या उत्साहाने तिचं हृदय फुलून निघालं. आपल्या सासरच्या नि आईच्या जावयाच्या लहानसहान गोष्टी ती मोठ्या तत्परतेने रंगवू लागली. आईच्या कुशीत माथा टेकलेला, डोळ्यांची झाकणं मिटलेली, अन् हृदयातलं गुपित उघड केलेलं! – किती सांगू न् किती नको...

## ३.३.१ अक्काचे माहेरी आगमन

तशी ही कथा पांढरपेशा मध्यमवर्गीय कुटुंबातील व्यक्तींचे चित्रण करते. या कथेची नायिका अक्का सासरहून माहेरी येते आहे. तिच्या आगमनाची आतुरता तिचे आई-वडिल, तिची भावंडं या सर्वांनाच आहे. सावित्रीबाई – तिची आई मोटर कधी कधी लेट होते हे जाणून होत्या. 'त्यांनी दाराच्या कडीला दुपारीच पळी अडकवून ठेवली होती' हे लेखकांचे वाक्य त्यांच्या बारीक निरीक्षणाचे द्योतक आहे. तसेच ते आईच्या मनातील काळजीचेही निदर्शक आहे. आपली मुलगी सुखरूप परत यावी असेच कोणत्याही आईला वाटणार. तिचे वडिल – अण्णा – बस सर्व्हिसला शिव्या मोजत होते, हा तपशील त्यांच्या मनातील भावछटा चित्रित करतो. मुलामुलींनी – भावंडानी अभ्यास संपवला होता व तीही वाट बघत होती.

माहेरचं घर जवळ येत चाललं तसं अक्काला नवऱ्यानं दिलेला प्रेमळ निरोप, सासरची माया आठवते, 'सारं घर हसण्यानं फुलुन गेलं' हे लेखकाचे वाक्य त्या कुटुंबाचं चित्र सर्व तपशिलांसह आपल्यासमोर उभं करतं. अक्का माहेरी आल्यावर सर्वांना जो आनंद वाटला त्याचे वर्णन कसे केले आहे ते लक्षात घ्या. ही दोनच वाक्ये पहा–

सावित्रीबाईंनी आधी नेत्रांना ओवाळावं की
भाकरीनं तेच सुचेनासं झालं.
अक्काला अगदी झपूर्झा घातल्यागत वाटलं.

तशी कथेची व्याख्या प्रा. ना. सी. फडके यांनी केली आहे. ते म्हणतात–
"शक्य तितक्या कमी पात्र-प्रसंगांच्या साहाय्यानं वाचकांच्या मनांवर एकच एक संस्कार प्रभावीपणे करणारी गोष्ट म्हणजे लघुकथा."

या कथेत अक्का-आई-वडिल, मुलं आणि मैत्रिणी अशी थोडीच पात्रे आहेत. प्रसंग देखील दोन-तीनच. पण ते प्रसंग उभे करण्याचे सामर्थ्य आहे लेखकाच्या निवेदनरीतीत.

या कथेत रूढार्थाने 'आदी-मध्य-अंत' असलेले कथानक नाही, पण प्रसंगांच्या मालिकेतून अक्काच्या भावस्थितीचे चित्रण केलेले आहे.

या पहिल्या प्रसंगाची अखेर ज्या वाक्याने होते ते किती प्रभावी आहे!
ते लिहितात –

आईच्या कुशीत माथा टेकलेला,
डोळ्यांची झाकणं मिटलेली
अन् हृदयातलं गुपित उघड केलेलं!
किती सांगू न् किती नको.

असं अर्थपूर्ण निवेदन कथेचे सौंदर्य असते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(क) आई आपली सखी आहे असे अक्काला का वाटले?

..........................................................................................................

..........................................................................................................

(ख) अक्का आल्यावर प्रत्येकाला आनंद झाला. तो आईने, वडिलांनी, आणि मुलांनी कसा दर्शवला ती लेखकाची वाक्ये शोधा आणि लिहा.

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

.......................................................................................................................

(ग) अक्काला स्वतःचाच हेवा का वाटला?

.......................................................................................................................

.......................................................................................................................

## ३.३.२ अक्कावर झालेला मायेचा, कौतुकाचा वर्षाव

**आता कथेचा दुसरा भाग वाचा**

अन् मग अक्काच्या ध्यानात आलं की, रात्र केव्हाच संपली अन् आईही अंथरुणावरून उठून गेली आहे. बोलता बोलता आपल्याला झोप लागली अन् झोपेतही आपण बोलतच राहिलो. सारी रात्र सुमधुर स्वप्नांनी अलगद उचलून नेली. स्वतःशीच हसत ती बराच वेळ अंथरुणावर लोळत राहिली. आज आठ-दहा महिन्यानंतर असं स्वातंत्र्य ती उपभोगीत होती. आज तिला कुणी म्हणायला नव्हतं : सुनबाई, चहा टाक, तांदूळ काढून घे, दहाला जेवणं तयार व्हायला पाहिजेत; सुनबाई... पुन्हा तोच चाळा मनात सुरू झाल्यावर गडबडून अक्का उठून बसली.

तेवढ्यात मैत्रिणींच्या धिंडका आल्या. म्हटलं, "माहेरवाशीण झोपली आहे वाटतं अजून? कुठं आहेत मिसेस काळे?" मैत्रिणींच्या टकळ्या दारात पाऊल टाकताच सुरू झाल्या. लगबगीने अक्का तोंड धुऊन आली. मग जिवाभावाच्या सख्या भेटताच एकच चिवचिवाट उडाला.

अक्काला क्षणाची उसंत नव्हती. नव्या-जुन्या साऱ्या गप्पाही एकदम निघाल्या. शाळेतल्या, खेळातल्या, हजर असलेल्या नि नसलेल्या मुलींच्याही! थोड्या वेळात साऱ्या उजळण्या झाल्या; अन् त्यातही निम्मा वेळ उगाचच हसण्या खिदळण्यात गेला.

मग सावित्रीबाई म्हणाल्या, "अग, तुला मावशीकडे जेवायला जायचं आहे. अजून अंग धुणंही झालं नाही तुझं! ऊठ! अजून महिनाभर राहायची आहेस ना? वाटेल तेवढा वेळ आहे गप्पा मारायला!—" अक्काला वाटलं, ह्या गप्पांना एक वर्षही नाही पुरायचं. पण ती हसत हसत उठली. "...ए, मग भेटू गं मोकळेपणानं." तिनं मैत्रिणींना निरोप दिला अन् ती नाचतच न्हाणीघरात घुसली.

किती वेळ तिचं न्हाणं व सौंदर्यप्रसाधन चाललेलं होतं. स्वतःच्या शरीराचे सोहाळे करण्यात ती अगदी रंगून गेली होती. आज लग्नानंतर आठ दहा महिन्यांनी तिला इतके मोकळेपणानं वागायला, वावरायला मिळत होतं. आज आठ-दहा महिन्यांनी ती आपल्या माहेरच्या माणसात आली होती. तिथेही सासरच्या साऱ्या सुखद स्मृती उमलत होत्या. त्यामुळे तिला हृदयात किती अडवू अन् ओठावर किती आणू असं झालं होतं.

**मावशीचा बाळू बोलावणं करायला आला तेव्हा तिची गाण्याची तार थांबली व ती लगबगीने मावशीकडे गेली. लग्न झाल्यापासून ती मावशीला भेटलीच नव्हती. मॅट्रिकची परीक्षा आटोपल्यावर ती सुट्टीत आजोळी आली. चार-पाच ठिकाणी तिला दाखवली अन् लगेच एका चांगल्या घरी तिचं लग्न जमलं! सारं इतकं झटपट झालं की, परत गावी येऊन सर्वांना भेटायचंही जमलं नाही तिला! मावशी लग्नाला येऊ शकली नाही व अक्काचीही सासरहून पाठवणी झाली नाही. आता मावशी भेटली की रागावणार, लग्नातल्या साऱ्या हकीकती विचारणार, हुंड्या-आहेरापासून सासूबाईंच्या खोकल्या-दम्यापर्यंत सारं सांगायला लावणार.**

**परंतु जेवण आटोपेपर्यंत तिला मावशीची मनमुराद बोलायला सापडलं नाही. मावशी स्वैपाकाच्या गडबडीत होती. खेरीज मावशीचे यजमान जरा कडक होते. अक्कादेखील त्यांच्याशी फारशी बोलत नसे. ते जेवून बाहेर जातील म्हणून ती मुकाट्याने वाट पाहत होती. परंतु त्यांचं जेवण आवरलं, तरी ते विडा खात तसेच बसून राहिले. अक्काला त्यांनी बोलावलं व तिच्या सासऱ्याबद्दल गप्पा मारायला सुरुवात केली.**

अक्का प्रथम घाबरली. मावशीच्या यजमानांचं वर्तन तिला कळेना. इतक्या गंभीर माणसाचं मोकळं बोलणं पाहून तिला आश्चर्य वाटू लागलं. मग हळूहळू सारा प्रकार तिच्या ध्यानात आला. आपल्या श्रीमंत नि प्रसिद्ध सासऱ्याची त्यांना माहिती आहे, थोडी फार तोंडओळख देखील आहे, हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. अक्काला त्यांची गंमत वाटली, अन् स्वतःबद्दल एकदम अभिमान वाटू लागला! कालपरवापर्यंत आपल्याला हा तऱ्हेवाईक गृहस्थ बायकोच्या माहेरची एक शाळकरी पोर समजत होता, तोच आज आपल्याशी अगत्याने बोलतो आहे!

त्यांचं अगत्य, अन् मग मावशीची माया. सगळं सगळं अक्काकडून काढून घेतलं तिनं. दागिने काय घेतले यापासून ते वाटण्या होणार का हचा पुढच्या गोष्टीही. काल रात्रीची आईची जिव्हाळ्याची जपणूक नि ही मावशीची सडेतोड भूमिका यात किती फरक!

चहा झाल्यावर मात्र ती निघाली. नव्या लुगड्याचा लफ्लेदार पदर सावरीत व मंगळसूत्र तीनतीनदा चाचपीत ती अभिमानाने चालू लागली. वाटेत तिला शाळेतले संस्कृतचे मास्तर भेटले. तिनं नमस्कार केला. मास्तरांनी तिचं कुशल विचारलं. त्यांच्याही बोलण्यात आदर अन् अभिमान आढळला तिला. जाताना मास्तरांनी कसलीशी कोटी संस्कृतात केली. तिचा तिला अर्थ उमगला नाही. पण वाटलं, आपल्या आदर्श नि वैभवशाली आयुष्याबद्दलचं ते सुभाषित असणार! स्वतःशीच हसत ती मधल्या आळीतून जाऊ लागली. वळणावर तिला रखमा भेटली. म्हातारी, साऱ्या गावभर हिंडणारी, प्रत्येक घरी आपलेपणाने पडेल ते काम करणारी रखमा! रखमाने तिला पाहाताच आनंदाने डोळ्यातून अश्रू काढले, कानशिलाशी बोटं दुमडली. 'गुणाची पोर माझी. सोन्यासारखं, मनासारखं मिळालं! औक्षवंत हो...' रखमाचे ते हृदयापासूनचे उद्‌गार पाहून अक्काचं मन भरून आलं.

दांडेकरांच्या येसूनं हाक मारली म्हणून ती धावली. उभ्याउभ्या जाऊन यायचं म्हणून चाळीत शिरली. तिला पाहताच आजूबाजूच्या बिऱ्हाडातली सारी उत्सुकतेनं तिला पाहायला जमली. लग्न जमत नाही म्हणून झुरणारी कमळी, नवऱ्याने टाकलेल्या विमलाबाई, मागल्या वर्षात विधवा झालेल्या रमाबाई. स्वतःच्या नवऱ्याची स्तुती करीत हिंडणारी बकुळा अन् लहान परकऱ्या नि साड्या नेसू लागलेल्या किती तरी पोरी! अक्काला सर्वांशी बोलायला वेळ कुठं होता? बोलायचं तरी काय हचा साऱ्याजणींशी? साऱ्या जणी किती क्षुल्लक, किती असंतुष्ट! अक्काला आपण फारच उच्च आहोतसं वाटू लागलं. भोवती जमलेल्या साळकायामाळकायांच्या हेव्याच्या, कुतूहलाच्या, आदराच्या नजरांनी ती न्हाऊन निघाली. तिला धन्य धन्य वाटलं. ...

•••

या दुसऱ्या भागात अक्कावर चहूबाजूंनी झालेल्या मायेच्या वर्षावाचे वर्णन आहे. 'तिला धन्य धन्य वाटलं' या वाक्यात या प्रसंगातला आशय साठलेला आहे.

अक्काला माहेरचे मोकळे जीवन उपभोगायला मिळाले. सासरी वावरताना जे ओझे मनावर असे ते नव्हते. मैत्रिणींचा घोळका आल्यावर सारेच वातावरण बदलते. लेखकांनी म्हटले आहे –

> जिवाभावाच्या सख्या भेटताच एकच
> चिवचिवाट उडाला

अक्काचे मनसोक्त न्हाणं आणि सौंदर्य प्रसाधन चाललं होतं. माहेरच्या माणसात आली तरी सासरच्या सुखद स्मृती उमलत होत्या.

या दुसऱ्या भागात मुख्यतः मावशीची माया, तिचे अगत्य आणि मावशीच्या कडक स्वभावाच्या नवऱ्याने प्रेमाने केलेली चौकशी याचे वर्णन आहे.

रखमा मोलकरीण तर तिला फार जवळची. तिचे कौतुकपूर्ण उद्‌गार किती अर्थपूर्ण आहेत! रखमा म्हणते–

> गुणाची पोर माझी. सोन्यासारखं,
> मनासारखं मिळालं! औक्षवंत हो!

या सर्वांच्या मायेच्या वर्षावात अक्का न्हाऊन निघाली. लेखक एकच वाक्य योजतो. ते वाक्य अक्काच्या भावस्थितीचे यथार्थ वर्णन करते. ते वाक्य असे –

> अक्काला आपण फारच उच्च आहोतसं वाटलं.

अक्काचे घर, मावशीचे घर, चाळीतली बिऱ्हाडे या सर्वांतील परस्परसंबंध लेखकांनी कसे उलगडले आहेत ते पाहा.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

(ध) अक्काला कोणतं स्वातंत्र्य उपभोगायला मिळाले?

........................................................................................................

(ड्) आई आणि मावशी यातला कोणता फरक अक्काला जाणवला? का?

........................................................................................................

........................................................................................................

(च) खालील व्यक्तींनी अक्काला उद्देशून कोणते उद्गार काढले?

| व्यक्ती | उद्गार |
|---|---|
| मैत्रिणी | |
| रखमा | |
| सासू | |

(छ) अक्काला धन्य धन्य वाटलं. यासाठी कोणत्या घटना घडल्या?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

(ज) वाक्यात उपयोग करून दाखवा.

**मन भरून येणे**

........................................................................................................

**चिवचिवाट**

........................................................................................................

**साळकाया माळकाया**

........................................................................................................

........................................................................................................

## ३.३.३ कथेची अखेर

**तिसरा भाग वाचा आणि मनन करा**

येसूचा निरोप घेऊन ती निघाली. संध्याकाळ झाली होती. मुलं शाळेतून येऊन त्यांची खाणीही आटपली असतील. लवकर घरी जायला पाहिजे. पण त्या घाईतही उभ्याउभ्या अक्का शनीच्या देवळात शिरली. कमरेचा एक आणा देवापुढे ठेवून तिने भक्तिभावाने प्रार्थना केली. देवळात वाती वळीत नि गप्पा कुटीत गावातल्या म्हाताऱ्या बाया बसल्या होत्या. तिथे ती नावाला टेकली. त्या बायकांनी तिची तोंड भरून स्तुती केल्यावर ती उठली. देवाला आल्याचं सार्थक झालं.

प्रसादाची खडीसाखर तोंडात विरघळून सारं तोंड गोड गोड झालं होतं. कौतुक-स्तुतीने गजबजलेल्या साऱ्या दिवसाने हृदयही अगदी घोळून निघालं होतं. घरी परतताना शाळेची इमारत, पिंपळाचा पार, कमेटीचा हौद, शिवणाच्या क्लासची जागा, सारी महत्त्वाची ठिकाणं आपल्याकडे कुतूहलाने व कौतुकाने पाहत आहेतसं अक्काला वाटलं. पूर्ण समाधानाने भरला दिवस संपवून ती घरी परत आली.

अक्का घरात आली ती त्याच तालात, त्याच झोकात, त्याच परिपूर्ण तुडुंब मनःस्थितीत! घरात शिरताच तिने गाणे गुणगुणायला सुरुवात केली.

पण लगेच ती थांबली. मुलं शाळेतून येऊन परत खेळायला बाहेर गेली होती. बहिणीही कुठे बाहेर गेल्या होत्या. घरात गडबड अगदी नव्हती. अण्णा समोर पत्ते खेळायला गेले होते. सावित्रीबाईसुद्धा स्वैपाकघर लावून देवदर्शनाला बाहेर पडल्या होत्या. विहिरीपाशी भांडी घासणाऱ्या चिमा मोलकरणीशिवाय दुसरं कुणी घरात नव्हतं. घरात शुकशुकाट होता.

अक्काचं गाणं थांबलं. पायही थबकले. स्वैपाकघरात जाऊन ती फुलपात्रभर पाणी प्याली. पण नंतर काय करावं तिला कळेना. तिला अगदी करमेनासं झालं. कालपासून आपण सारख्या हिंडत आहोत, बडबडतो आहोत, पण आपण दमलो कशा नाही, कंटाळलो कशा नाही, ह्याचा तिला विस्मय वाटला. तोही क्षणभरच! पुन्हा आपण एकट्या मोकळ्या आहोत, ही जाणीव होताच तिला कसंसच झालं.

अक्काने देवघरातली समई लावली. समईतल्या साऱ्या वाती फुलवल्या. पण तो मंद, स्निग्ध उजेड तिला क्षीण, क्षुद्र भासला. भराभर तिने साऱ्या घरातले दिवे लावले. छे! सारा कृत्रिम आखलेला उजेड! अक्काला कससंच वाटू लागलं. तिने देवाचं नाव घेतलं, नवऱ्याचं नाव घेतलं, पण हृदयातली हुरहूर शमली नाही. ही सायंकाळची वेळच मोठी चमत्कारिक!

हळूहळू ती मागील दारी आली. बाहेर सायंकाळचं वातावरण पसरलं होतं. दिवसभरची धमाल व रात्रीचा किरकिराट ह्यामधील नुसती निःशब्दता! सारं मूक झालेलं. अंतर्मुख बनलेलं! मन हालवून सोडणाऱ्या वृक्षांच्या भव्य सावल्या, हृदयतळाचा ठाव घेणारं दूरचं धूसर क्षितिज! दडवलेल्या आठवणी! उजळणाऱ्या कातरवेळेच्या संध्याछाया! शून्यपणे आजूबाजूला पाहताच अक्काचं मन अगदी पोकळ पोकळ झालं.

... अन् मग अचानक आठवण आली. पुसून टाकलेली, बुजवून टाकलेली. त्या विलक्षण वातावरणात सारी स्मृती स्पष्ट झाली. किती भाबडा नि किती हसरा चेहरा! वर्गात नेहमी पहिला नि माझ्या हृदयातही एकमेव! इतिहासाच्या पुस्तकातून त्याने पाठवलेली चिठ्ठी. अन् तळ्यातल्या गणपतीजवळ चोरून झालेली गाठभेट नि आणाभाका. त्याच्या आठवणीने अश्रूंनी भिजवेले क्षण अन् सुखस्वप्नात डुंबलेलं मन – अविनाश, मी संसार थाटला; पण तू – तू कुठं आहेस रे! आता ह्या कातरवेळी, अविनाश, तू कसली आठवण करीत बसला असशील रे?...

●●●

तिसऱ्या भागात कथेला वेगळीच कलाटणी मिळते आणि अक्काच्या भावस्थितीच्या वेगवेगळ्या रंगछटांची आपल्याला जाणीव होते.

सर्वांनी तिची तोंड भरून स्तुती केलेली असल्यामुळे तिचे हृदय अगदी घोळून निघाले.
पूर्ण समाधानाने भरलेला दिवस संपला.
लेखक लिहितात –

> तिने देवाचं नाव घेतलं, नवऱ्याचं नाव घेतलं
> पण हृदयातली हुरहुर शमली नाही.

याच कातरवेळी दडवलेल्या आठवणी जाग्या झाल्या. अचानक जागी झालेली आठवण अविनाश संबंधीची आहे.
अक्का म्हणते – अविनाश, मी संसार थाटला;

> पण तू – तू कुठं आहेस रे!
> आता ह्या कातरवेळी तू कसली
> आठवण करीत बसला असशील रे?

या प्रश्नातल्या 'रे' या शब्दाने तिच्या मनातली हुरहुर स्वच्छ होऊन जाते.

लेखक लिहितात –

> किती भाबडा नि किती हसरा चेहरा
> वर्गात नेहमी पहिला नि माझ्या हृदयातही
> एकमेव!

या कथेचा संस्कार होतो तो अक्काच्या भावस्थितीच्या बदलत्या रंगांचा. आनंद, धन्यता आणि कातरवेळी झालेली अविनाशची आठवण यातून तिच्या मनःस्थितीचे फूल उमलून जाते.

अक्काचे भरून आलेले डोळे आपल्यासमोरून हलत नाहीत.
सासर-माहेरी वावरणारी अक्का अविनाशच्या अचानक आठवणीमुळे भारावून जाते.

(झ) अक्काला अविनाशची आठवण कातरवेळी का होते?

.......................................................................................................

.......................................................................................................

## ३.४ नमुना उत्तरे

(क) आई आता आपल्या संसारातील अडचणी, सुखदुःखे आपलंपणाने ऐकणारी सखीपण आहे.
(ख) अण्णांनी ड्रायव्हरशी विनोद केला. मुलांनी तिचं सामान गडी धावायच्या आत बाहेर काढलं. तिच्या अंगाशी बाळगोपाळांनी लोंबकळायला सुरुवात केली. आईला नेत्रांनी ओवाळावं की भाकरीनं हेच सुचेनासं झालं.
(ग) आई-वडील, भावंडं यांची माया, कौतुक करणारा पती आणि सासरची माणसं लाभली म्हणून.
(घ) सासरची बंधनं नव्हती. मनसोक्त वेळ काढता येत होता, गप्पा मारता येत होत्या.
(ङ) आईची जिव्हाळ्याची जपणूक व मावशीची सडेतोड भूमिका यातला फरक जाणवला.
(च) मैत्रिणी – 'माहेरवाशीण झोपली आहे वाटतं अजून!'
रखमा – 'गुणाची पोर माझी! सोन्यासारखं मनासारखं मिळालं, औक्षवंत हो!'
सासू – 'सूनबाई चहा टाक, तांदूळ काढून घे.'
(छ) मावशीचे यजमान अगत्यानं बोलले.
शिक्षकांनी आशीर्वाद दिले.
मैत्रिणीनी कौतुक केले,
रखमा मोलकरणीनं तोंड भरून 'औक्षवंत हो' अशा शब्दात कौतुक केलं.
माहेरच्या मायेला तर तोडच नव्हती.
(ज) १. तो सुंदर देखावा पाहून मन भरून आलं.
२. मैत्रिणींचा चिवचिवाट उडाला तेव्हा तिचं मन सुखावलं.
३. साळकायामाळकायांनी अक्काच्या भाग्याचा हेवा किती करावा.
(झ) अक्काच्या हृदयातही एकमेव प्रीतीचा धागा म्हणजे अविनाश. त्याची गाठभेट व आणाभाका आठवतात. पुसून टाकलेली स्मृती कातरवेळी जागी होते.

## ३.५ अधिक अध्ययन

### ३.५.१ कथेचे भाषिक विशेष

(अ) खालील वाक्यांचा विचार करा.
१. सारं घर हसण्यानं फुलून गेलं.
२. सावित्रीबाईंना आधी नेत्रांनी ओवाळावं की भाकरीनं तेच सुचेनासं झालं.
३. जिवाभावाच्या सख्या भेटताच एकत्र चिवचिवाट उडाला.
४. घराचं गोकुळ होऊ दे.
५. आदराच्या नजरांनी ती न्हाऊन निघाली.

पहिल्या वाक्यात 'घर' हा शब्द पहा. 'हसण्यानं फुलून गेलं' या शब्दप्रयोगामुळं घराला जिवंत व्यक्तिमत्व लाभतं.

क्र. २ ते ५ वाक्यात रूपकात्मक रचना आहे ती बघा. नेत्रांनी ओवाळावं, चिवचिवाट उडाला, घराचं गोकुळ, आदराच्या नजरा

(ब) या कथेतील वातावरण कौटुंबिक आहे. ते उभे करावे म्हणून लेखकांनी वाक्ये कशी योजिली आहेत ते लक्षात घ्या.
१. ते ओढ लावणारे निरोप अन् हे वेड लावणारं स्वागत
२. लगेच नवऱ्याला पत्र लिहायला बसणार असशील?
३. दर घासागणिक एकत्र! संसार, स्वर्गसुख!
४. त्या स्वैंपाकघर लावून बाहेर पडल्या.
५. आईने देवघरातली समई लावली.

(क) 'सुटी' हा शब्द उच्चारताना 'सुट्टी' असा उच्चारला जातो. तसाच 'चिठी' हा शब्द उच्चारताना 'चिठ्ठी' असा उच्चारला जातो.

## ३.५.२ जुनी आणि नवी कथा

जुन्या कथेत एकामागून एक अशा स्थलकालानुक्रमाने घडलेल्या प्रसंगांच्या गुंफागुंफीने कथानकाची उभारणी होत असे. कथानक रचणे हा नव्या कथेचा हेतू नाही. एखाद्या व्यक्तीच्या मनःस्थितीचे, तिच्या एखाद्या भावस्थितीचे चित्र नवी कथा रेखाटते किंवा एखाद्या यःकश्चित भासणाऱ्या जीवनातील अनुभवाचे नाट्य रंगवते किंवा एखादा लहानसा प्रसंग अर्थपूर्ण करते किंवा एखाद्या निसर्गदृश्याचे सहजचित्र नव्या कथेत रेखाटलेले असते. कार्यकारण शृंखलाबद्ध कथानक कथेत नसतानाही एखादी कथा अर्थाची अनंत वलये निर्माण करू शकते. नव्या कथेने कथानकासंबंधीच्या सांकेतिक कल्पना बदलल्या.

नव्या कथेने प्रदर्शनाचा सोस कधीच बाळगला नाही. घटनेमागून घटनेचे अत्यावश्यक तेवढेच चित्रण करावे, मोजक्या शब्दात, अनलंकृत धाटणीने वर्णन करण्याची नव्या कथेची रीत आहे.

सरळ रेषेत विकास पावणाऱ्या जुन्या कथेला लांबी व रुंदी ही दोनच परिमाणे होती. पण नव्या कथेला खोली आणि काल ही आणखी दोन परिमाणे लाभली. जुन्या कथेत व्यक्तिचित्रण या घटकाला महत्त्व होते. पण व्यक्तिमनाचे विविध पातळ्यांवर दर्शन घडवल्याशिवाय व्यक्तिचित्रण अर्थपूर्ण होणार नाही ही नव्या कथेची अपेक्षा आहे.

कथनशैली केवळ नटवण्यासाठी नाही तर तो एक कथेचा अविभाज्य घटक आहे ही जाणीव नव्या कथेने रूजवली.

## ३.५.३ अरविंद गोखले यांचे कथालेखन विशेष

- स्त्रिया-पुरुष, मुले, म्हातारी माणसे – कोणीही असो त्यांना गोखले सहानुभूतीने जाणून घेतात. त्यांच्या अंतर्मनातील आंदोलने त्यांना चित्रित करता येतात.
- माणसाच्या जीवनाला वेढून टाकणारे दुःख त्यांना फार जवळचे वाटते: माणसांच्या मनात शिरून त्यांचे दुःख ते हळुवारपणे रंगवतात.
- कथेतील व्यक्तींचे सुखदुःख त्यांनी समरस होऊन जाणलेले असते. पण त्या सुखदुःखाचे चित्रण मात्र ते अलिप्ततेने करू शकतात.
- त्यांचे निवेदन कौशल्य अत्यंत संयमित आहे.
- माणसातच गोखले रंगतात. माणसांच्या जीवनातील 'नाट्य' त्यांना आकर्षिक करते.

## ३.५.४ लेखक-परिचय

अरविंद गोखले म्हणजे मराठीतील नवकथेचे एक शिल्पकार. गंगाधर गाडगीळ यांच्या बरोबरीने त्यांनी नवकथेला दिशा दिली.

१९३५ मध्ये त्यांनी पहिली कथा 'हेअर कटिंग सलून' ही लिहिली. तेव्हापासून ते आजतागायत व्रतस्थपणे कथालेखन करीत आहेत. कथा या साहित्यप्रकारावर अविचल प्रेम करणारे ते कथालेखक आहेत. नजराणा, उन्मेष, जन्मखुणा, मंजुळा, कमळण, तनुजा, मनोज, अभोगी असे कितीतरी कथासंग्रह प्रसिद्ध आहेत.

## ३.५.५ कथेच्या काही व्याख्या

**शं. ह. देशपांडे**

"सुंदर, विस्मयकारक, आश्चर्यपूर्ण, चमत्कृतिजनक अथवा अद्‌भुतरम्य अशा एखाद्या क्षणाचे मानवी स्वभावाला धरून असलेले, वस्तुस्थितीचा विपर्यास न करणारे, जिवंत लेखणीने, मनोहर भाषेत सजवलेले चित्र म्हणजे लघुकथा."

**प्रा. वा. ल. कुळकर्णी**

"जीवनाच्या जेवढ्या भागावर आपली दृष्टी लघुकथा केंद्रित करते त्या भागाचे एक सत्य, त्या भागाचे एक गमतीदार रहस्य, जीवनाच्या दृष्टीने त्यात सामावलेला अर्थ जणू कथेच्या प्रकाशात एकदम व्यक्त होऊ पाहतो."

**एच. ई. बेटस्**

"The short-story is the most flexible of all prose-forms. It can be anything from a prose-poem without plot or character, to an analysis of the most complex human emotions."

## ३.६ सारांश

'कातरवेळ' ही व्यक्तीच्या भावस्थितीचे बदलते रंग चित्रित करणारी कथा आहे. या कथेत माहेरी आलेल्या नवविवाहित तरुणीचे – अक्काचे – हृद्य चित्र आहे. आई-वडील, भावंडे, मैत्रिणी, मोलकरीण या सर्वांनी तिच्यावर मायेचा आणि कौतुकाचा वर्षाव केला आहे. तिचा पती, तिचे सासर हाही तिच्या आनंदाचा ठेवाच.

दिवसभर आनंदाच्या लाटांवर तरंगत असलेली मुग्ध माहेरवाशीण सायंकाळच्या धूसर छाया सृष्टीवर पसरू लागताच अचानक अस्वस्थ होते आणि पुसून टाकलेली, बुजवून टाकलेली आठवण एकाएकी जागी होते. तळयाच्या गणपतीजवळ चोरून झालेली अविनाशची भेट आणि प्रीतीच्या झालेल्या आणाभाका तिला आठवतात. तिच्या मनात येते – अविनाश, मी संसार थाटला, पण तू – तू कुठे आहेस रे! आता ह्या कातरवेळी, तू कसली आठवण करीत बसला असशील रे!" अशी विलक्षण हुरहुर तिला वेढू लागते.

## ३.७ सरावासाठी अध्याय

१. 'कातरवेळ' या कथेचे रसग्रहण करा.
२. या कथेच्या आधारे अरविंद गोखले यांच्या कथालेखनाचे कोणते विशेष तुमच्या ध्यानात येतात ते सांगा.
३. या कथेची नायिका अक्का आहे. अक्काच ही कथा सांगते आहे अशी कल्पना करून ही कथा लिहून काढा.
४. आता हे संध्याकाळचे वर्णन बघा.
"ही सायंकाळची वेळच मोठी चमत्कारिक. बाहेर सायंकाळचं वातावरण पसरलं होतं. दिवसभरची धमाल व रात्रीचा किरकिराट ह्यांमधली नुसती निःशब्दता! सारं मूक झालेलं, अंतर्मुख बनलेलं! मन हालवून सोडणाऱ्या वृक्षाच्या भव्य सावल्या, हृदयतळाचा ठाव घेणारं दूरचं धूसर क्षितिज! उजळणाऱ्या कातरवेळेच्या संध्याछाया."

तुम्ही संध्याकाळचे वर्णन करणारा परिच्छेद लिहा.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. **अरविन्द गोखले यांची कथा** – संपादक : भालचंद्र फडके, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०
२. **साहित्य, अध्यापन आणि प्रकार** – संपा.: भागवत-रसाळ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
३. **मराठी कथा : उगम आणि विकास** – इंदुमती शेवडे
४. **लघुकथा मंत्र : आणि तंत्र** – ना. सी. फडके
५. **सहा कथाकार** – संपा. भालचंद्र फडके
६. **पाच कथाकार** – संपा. वि. स. खांडेकर